# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 17 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १७ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय.
- सर्व शासकीय सेवा मोबाईलवर उपलब्ध करून देण्यासाठी प्रणाली विकसित करण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना.
- अजिंठा वेरूळ चित्रपट महोत्सवामुळे सर्जनशीलतेला व्यासपीठ–केंद्रीय माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांचे गौरवोद्गार.
- हिंगोली जिल्ह्यात सारंगवाडी इथं भाजीचा महाप्रसाद घेण्यासाठी भाविकांची गर्दी.

आणि

- नांदेड मेडिकल फाऊंडेशनचा सेवा पुरस्कार "शुभंकरोती फाऊंडेशन" संस्थेला जाहीर.

****

केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी आठव्या वेतन आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलतांना ही माहिती दिली. सातव्या वेतन आयोगाचा कालावधी २०२६ मध्ये संपणार आहे, आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेमुळे आयोगाच्या शिफारशी मिळविण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल, असं वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले...

> ***केंद्र सरकार के सभी कर्मचारियों के लिये 8th Pay Commission के मंजुरी दे दी है। प्रधानमंत्रीजी ने एक रेग्युलर***

***रिदम के साथ पे कमिशन बनाने का जो एक संकल्प लिया है, उसके हिसाब 2016 मे सेवंथ पे कमिशन स्टार्ट हुआ था, तो 2026 मे इसका टर्म कंप्लिट होता है।***

****

७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. २५ आणि २६ जानेवारी रोजी ते भारत दौऱ्यावर येतील. गेल्या वर्षी राष्ट्राध्यक्षपदाची सुत्रं हाती घेतल्यानंतर त्यांची ही पहिलीच भारत भेट आहे.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्रोनं स्पेस डॉकिंग प्रयोगाअंतर्गत अवकाशात उपग्रहांची जोडणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. इस्रोनं सामाजिक माध्यमावर ही घोषणा केली. या तंत्रज्ञानात यश मिळवणारा भारत हा जगातला चौथा देश बनला आहे.

****

राज्यातल्या नागरिकांना जास्तीत जास्त शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ऑनलाईन प्रणाली विकसित करण्याची सूचना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ते काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बोलत होते. राज्यात विविध विभागांच्या ९६९ सेवांपैकी ५३६ सेवा आपले सरकार पोर्टलवर तर ९० सेवा संबंधित विभागांच्या पोर्टल वर उपलब्ध आहेत. उर्वरित सुमारे ३४३ सेवा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

****

राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार असल्याची घोषणा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. काल मुंबईत वांद्रे–कुर्ला संकुलात जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये 'राष्ट्रीय स्टार्टअप दिवस' कार्यक्रमाचं, मुख्यमंत्र्यांनी ए आय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दीप प्रज्वलन करून उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते.

***महाराष्ट्रामध्ये आम्ही इनोव्हेशन सिटी ही तयार करू. ज्या प्रकारे गिफ्ट सिटी तयार झाली आहे, तशा प्रकारे इनोव्हेशनचा फोकस असलेली सर्व प्रकाराने उपयुक्त अशा प्रकारची एक इनोव्हेशन सिटी***

***आम्ही तयार करणार आहोत. आणि अतिशय वेगाने. With the speed, we want to create this city.***

****

शेत जमीन वहिवाट रस्ता करण्याबाबत तहसीलदारांना निर्णय घेता यावा, यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. ते काल मंत्रालयात याबाबत झालेल्या बैठकीत बोलत होते. शासनाने शेत रस्त्यांचं वर्गीकरण केलं आहे, त्यानुसार जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्याच्या सूचना बावनकुळे यांनी यावेळी केल्या.

****

राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्याकडून सिडको अध्यक्षपदाचा कार्यभार कमी करण्यात आला आहे. शिरसाट यांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश झाल्यामुळे हा निर्णय घेतल्याचं, याबाबतच्या शासन निर्णयात म्हटलं आहे.

****

अजिंठा वेरूळ चित्रपट महोत्सवामुळे सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळत असल्याचे गौरवोद्गार केंद्रीय माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू काढले आहेत. छत्रपती संभाजीनगर इथं दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ते काल बोलत होते. महोत्सव समितीच्या वतीने जाजू यांचा सत्कार करण्यात आला. एमजीएम विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या महोत्सव विशेषांकाचं, जाजू यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं. काल महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी मास्टर क्लास या सदरात प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, पटकथाकार तिग्मांशू धुलिया तसंच आशुतोष गोवारीकर यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली.

****

दरम्यान, एमजीएम विद्यापीठाच्या शार्ङ्गदेव महोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. महागामीच्या वतीनं आयोजित या तीन दिवसीय महोत्सवात दररोज सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या सादरीकरणात यंदा ज्योती हेगडे यांचं रुद्र वीणा वादन, दशावतार प्रयोग, सुखद मुंडे आणि समूहाचं पखवाज वादन, प्रसिद्ध गायक भुवनेश कोमकली यांचं ख्याल गायन, आदी सादरीकरणांसह दररोज सकाळी दहा वाजता शार्ङ्गदेव प्रसंग या व्याख्यानमालेसह, शार्ङ्गदेव प्रवाह या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे.

महोत्सवात शार्ङ्गदेव स्पंदन हे प्रदर्शनही पाहता येणार आहे. महोत्सवाचं हे १६ वं वर्ष आहे.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या औंढा नागनाथ तालुक्यातल्या सारंगवाडी इथल्या डोंगरावर संक्रांतीच्या तिसऱ्या दिवशी भाजीचा महाप्रसाद आयोजित केला जातो. काल या ऐतिहासिक यात्रेला भाविकांनी मोठी गर्दी केली. सुमारे दीड लाख भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे...

***परिसरातील शेतांमध्ये पिकलेल्या ४० प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या व कंदमुळे यांचा समावेश असलेल्या १४० क्विंटल भाजीच्या महाप्रसादाचा लाभ उपस्थित भाविकांनी घेतला. भाजीच्या महाप्रसादाचे सेवनाने वर्षभर रोगराई होत नाही अशी गाढ श्रद्धा असलेल्या भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.***

***आकाशवाणी बातम्यांसाठी रमेश कदम हिंगोली.***

****

नांदेड मेडिकल फाऊंडेशनचा सेवा पुरस्कार "शुभंकरोती फाऊंडेशन" या सामाजिक संस्थेला जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह आणि रोख रक्कम या स्वरुपातले हे पुरस्कार येत्या २२ तारखेला प्रदान करण्यात येणार आहेत.

****

बीड इथं महारेशीम अभियानाअंतर्गत चित्ररथाला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी हिरवा झेंडा दाखवून अभियानास सुरुवात केली. हे अभियान नऊ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. राज्यात बीड जिल्हा रेशीम उत्पादनात प्रथम क्रमांकावर असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे...

***सध्या बीड जिल्ह्यात सुमारे साडे पाच हजार शेतकरी रेशीम उद्योगात कार्यरत आहेत, कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत विभागाकडून शासनमान्य कोष खुली बाजारपेठ उभारण्यात आली असून यामध्ये होणाऱ्या कोष खरेदीत बीड जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. उसतोड कामगारांचा जिल्हा ही ओळख मागे पडून आता बीडची रेशीम उत्पादक जिल्हा म्हणून ओळख निर्माण होत आहे.***

***रवी उबाळे आकाशवाणी बातम्यांसाठी बीड.***

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात होत असलेले आणि होऊ घातलेले मोठ्या गुंतवणूकीचे पायाभुत सुविधा प्रकल्प कार्यान्वित करतांना, प्रकल्पाचं नियोजन तसंच प्रगतीचं मूल्यमापन होणं आवश्यक असल्याचं, विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात काल झालेल्या प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. जिल्ह्यातल्या विविध विभागांचे १२० यंत्रणा प्रमुख आणि कर्मचारी या प्रशिक्षणात सहभागी झाले होते.

****

लातूर जिल्हा प्रशासनामार्फत भटक्या विमुक्त प्रवर्गातल्या नागरिकांना त्यांच्या पालावर जावून विविध शासकीय सेवांचा लाभ देण्यात आला आहे. या उपक्रमाचं, छत्रपती संभाजीनगर विभागाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी कौतुक केलं. हा उपक्रम म्हणजे संवेदनशील प्रशासनाचं उत्तम उदाहरण असल्याचं, त्यांनी म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं राज्यस्तरीय मिनी सरस २०२५ या महिला बचत गटांच्या उत्पादनाच्या प्रदर्शनाचं उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते काल झालं. या प्रदर्शनात १२ जिल्ह्यातल्या बचत गटांच्या महिला सहभागी झाल्या आहेत.

****

बीड जिल्ह्यात गेल्या पंधरा दिवसात वीज देयक थकबाकीपोटी ९४८ वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे. जिल्ह्यात वीज देयकांची थकबाकी ३६० कोटी रुपयांवर पोहोचली असल्यानं, ही थेट कारवाई करण्यात येत असल्याचं, महावितरण कंपनीकडून सांगण्यात आलं.

****

महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे संचालक प्राध्यापक हेमंत पाटील यांचं काल लातूर इथं निधन झालं, ते ६१ वर्षांचे होते. पाटील यांच्या पार्थिव देहावर आज लातूर इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत

****

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त परभणी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामध्ये ग्रंथ प्रदर्शनाचं उद्घाटन कथाकार राजेंद्र गहाळ यांच्या हस्ते झालं. हे ग्रंथ प्रदर्शन येत्या २८ जानेवारीपर्यंत चालणार आहे.

****

धाराशिव इथल्या हजरत शमशुद्दीन गाझी यांच्या ७२० व्या उर्स निमित्त काल जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांच्या प्रमुख उपस्थितीत संदल मिरवणूक काढण्यात आली. यानिमित्ताने कव्वाली गायन, मुशायरा यासारखे विविध कार्यक्रम आणि धार्मिक कार्यक्रम होत आहेत.

****

नांदेड इथ निवडणूक कामकाजात सहकार्य करणाऱ्या नागार्जुन पब्लिक स्कूलच्या कर्मचाऱ्यांचा काल जिल्हाधिकाऱ्यांनी सत्कार केला. या शाळेने सर्व बाबींचे भरीव सहकार्य केल्यामुळे शाळेचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

****